## आजचे पंचांग

दिनांक : १३ ऑगस्ट २०२६ वार : गुरुवार माह (अमावस्यांत) : श्रावण माह (पूर्णिमांत) : श्रावण ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : शुक्ल पक्ष तिथी : प्रथम तिथी (रात्री ०८:४१ पर्यंत) त्यानंतर द्वितीया तिथी नक्षत्र : मघा नक्षत्र (१४ ऑगस्ट पहाटे ०४:३७ पर्यंत) त्यानंतर पूर्वा फाल्गुनी नक्षत्र योग : वरीयान योग (दुपारी १२:१५ पर्यंत) त्यानंतर परिघ योग करण : किंस्तुघना करण

# दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

## भटक्या श्वानांसाठी पुणे पालिका रोज देणार १०३ रुपये

**पुणे :** शहरातील भटक्या व मोकाट श्वानांच्या व्यवस्थापनासाठी पुणे महापालिकेने आता ॲनिमल वेल्फेअर संस्थांच्या सहकार्याने खासगी शेल्टरची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका हद्दीत किंवा हद्दीबाहेर स्वतःच्या अथवा भाडेतत्त्वावरील जागेत शेल्टर उभारून भटक्या श्वानांची देखभाल करण्यासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया मान्यताप्राप्त संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत.

आरएनआय : MAHMAR/2021/85884 गुरूवार, दि. १३ ऑगस्ट २०२६ वर्ष - १ अंक - ३१६ पाने - ४ पुणे/पिंपरी-चिंचवड

## सारांश वृत्त

### निकाल आधी ठरवला, कारणे नंतर शोधली! ठाकरे गटाच्या वकिलांचा निवडणूक आयोगावर थेट हल्ला; सिब्बलांच्या युक्तिवादाने सुनावणी तापली

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** शिवसेना पक्ष आणि धनुष्यबाण चिन्हाच्या वादावर सुरू असलेल्या न्यायालयीन सुनावणीत ठाकरे गटाचे ज्येष्ठ विधिज्ञ कपिल सिब्बल यांनी निवडणूक आयोगाच्या भूमिकेवरच गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. शिंदे गटाला लाभ देण्यासाठी आधी निकाल ठरवण्यात आला आणि त्यानुसार कारणे ठरवण्यात आली, असा थेट आरोप सिब्बल यांनी केला. त्यामुळे निवडणूक आयोगाचा निर्णय आता पुन्हा न्यायालयीन कसोटीवर आला आहे.

सिब्बल यांच्या युक्तिवादाचा केंद्रबिंदू होता तो २०१८ सालच्या शिवसेना पक्षघटनेचा. ही घटना निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आली होती आणि त्यावर आयोगाचा शिक्काही होता, असा दावा त्यांनी केला. तरीही ती रेकॉर्डवर नसल्याचे सांगून आयोगाने निष्कर्ष काढला, हे अविश्वसनीय असल्याचे सिब्बल यांनी न्यायालयात म्हटले.

त्यांच्या मते, २०१८ ची घटना शिंदे गटाला मान्य नव्हती; मात्र त्याच घटनेच्या आधारे शिंदे गटातील आमदार आणि मंत्री झाले. जर ही घटना बनावट असल्याचा दावा होता, तर आयोगाने त्यावेळीच त्यावर कारवाई करायला हवी होती. पण पक्षाच्या घटनेकडे दुर्लक्ष करून नंतरचा निर्णय एका विशिष्ट गटाला लाभदायक ठरवण्यात आला, असा आरोप सिब्बल यांनी केला.

सिब्बल यांनी तीन प्रमुख मुद्दे मांडलेविधिमंडळातील फूट म्हणजे पक्षातील फूट नाही; आयोगाने पक्षघटना आणि संघटनात्मक बहुमत दुर्लक्षित केले; तसेच आयोगाने अधिकार वापरण्यापूर्वी आवश्यक राजकीय फूट प्रथमदर्शनी सिद्ध झालेली नव्हती.

याहून गंभीर इशारा देताना सिब्बल म्हणाले की, आयोगाचा हा दृष्टिकोन कायम राहिला तर काही आमदार पक्षातून फुटून स्वतःलाच संपूर्ण पक्ष म्हणवू शकतात आणि पक्ष व निवडणूक चिन्हावर दावा करू शकतात. अशी पद्धत लोकशाहीसाठी धोकादायक ठरेल, असा दावा त्यांनी केला. आता प्रश्न केवळ शिवसेनेचा नाही; पक्षफुटी, पक्षघटना आणि निवडणूक चिन्हावर अंतिम अधिकार कोणाचायाचा लोकशाहीतील पुढचा नियम न्यायालय ठरवणार का? याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# एफसीआरए विधेयकाचा जेपीसीकडे धावता रेफरन्स; एनजीओ निधीच्या नावाखाली विरोधकांना आवळण्याचा डाव?

### विरोधकांचा आरोपअल्पसंख्याक संस्थांना लक्ष्य; सरकारचा इन्कार; ३१ सदस्यीय जेपीसीकडे विधेयक, हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात अहवाल अपेक्षित

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

परदेशातून मिळणाऱ्या निध्यावर नियंत्रण ठेवणाऱ्या Foreign Contribution Regulation Act (FCRA) मध्ये बदल करण्यासाठी केंद्र सरकारने आणलेल्या विधेयकाला लोकसभेने संयुक्त संसदीय समितीकडे (JPC) पाठवले आहे. सरकारच्या मते या विधेयकाचा उद्देश परदेशी निधीच्या वापरात पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढवणे हा आहे. मात्र विरोधकांनी या दाव्यावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले असून, सरकारच्या विचारसरणीला विरोध करणाऱ्या स्वयंसेवी संस्था आणि सामाजिक संघटनांचा आर्थिक कणा कमकुवत करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप केला आहे.

या विधेयकामुळे देशातील NGO, सामाजिक संस्था आणि अल्पसंख्याक संस्थांना परदेशातून मिळणाऱ्या निधीच्या वापराबाबत आणखी कडक नियम लागू होण्याची शक्यता आहे. त्यामुळे विधेयक मागे घेण्याची मागणी विरोधकांनी केली आहे. विशेषतः सरकारच्या धोरणांवर टीका करणाऱ्या संस्थांवर प्रशासकीय कारवाईचा दबाव वाढू शकतो, अशी भीती विरोधक व्यक्त करीत आहेत.

**सरकारचा दावा वेगळा, विरोधकांचा संशय वेगळा**

केंद्र सरकारने मात्र विरोधकांचे आरोप फेटाळले आहेत. FCRA अंतर्गत निधीचा गैरवापर रोखणे, आर्थिक पारदर्शकता वाढवणे आणि परदेशी निधीचा वापर नियमानुसार होत आहे की नाही, याची प्रभावी तपासणी करणे हा विधेयकाचा उद्देश असल्याचे सरकारचे म्हणणे आहे.

पण प्रश्न एवढाच आहेनिधीच्या गैरवापराविरोधातील कायदा आणि सरकारविरोधातील आवाजावर आर्थिक निर्बंध यांच्यातील सीमारेषा कोण ठरवणार?

याच ठिकाणी विरोधकांचा आक्षेप गंभीर ठरतो. सरकारी धोरणांवर टीका करणाऱ्या NGO किंवा सामाजिक संस्थांवर कारवाई करण्यासाठी FCRA हा अप्रत्यक्ष दबावाचे साधन बनू शकतो, असा त्यांचा दावा आहे.

**३१ खासदारांची समिती; अंतिम कसोटी आता JPCसमोर**

लोकसभेने विधेयक JPCकडे पाठवले असून समितीत लोकसभेचे २१ आणि राज्यसभेचे १०, असे एकूण ३१ सदस्य असतील. समितीने हिवाळी अधिवेशनाच्या पहिल्या आठवड्यात आपला अहवाल सादर करणे अपेक्षित आहे.

यामुळे विधेयकाच्या प्रत्येक तरतुदीची तपासणी करण्याची संधी संसदेला मिळणार आहे. विशेषतः परदेशी निधी मिळवणाऱ्या संस्थांवर कारवाईचे अधिकार किती व्यापक असतील, प्रशासकीय निर्णयांविरोधात अपीलची प्रक्रिया किती प्रभावी असेल आणि सरकारच्या टीकाकारांना लक्ष्य करण्याची शक्यता निर्माण होणार नाही ना, याची छाननी महत्त्वाची ठरणार आहे.

**'अमित शाहांचा राजकीय डाव'आरोप सिद्ध करण्यासाठी पुरावे गरजेचे**

विरोधक या विधेयकाला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या राजकीय रणनीतीशी जोडत आहेत. सरकारविरोधी विचारांच्या NGOना परदेशी निधीपासून दूर ठेवून त्यांचा प्रभाव कमी करण्याचा हा प्रयत्न असल्याचा आरोप केला जात आहे.

मात्र हा आरोप सध्या राजकीय आरोप म्हणूनच पाहावा लागेल. विधेयकाचा अंतिम मजकूर, JPCमधील चर्चा आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वी कोणत्या संस्थांवर काय परिणाम होईल, यावरूनच या आरोपाची वस्तुनिष्ठ कसोटी होईल.

खरा प्रश्न त्यामुळे सरकारविरोधक विरुद्ध सरकार असा नसून नियमनाच्या नावाखाली नागरी समाजाचा आवाज किती नियंत्रित केला जाणार? हा आहे.

FCRA कायदा देशाच्या आर्थिक सुरक्षेसाठी आवश्यक असू शकतो; पण तो सरकारवर टीका करणाऱ्या आवाजांसाठी 'आर्थिक लगाम' ठरला, तर लोकशाहीसमोर गंभीर प्रश्न उभा राहतील. आता गझ्झउसमोरची खरी परीक्षा हीचनिधीवर नियंत्रण ठेवायचे की असहमतीवर?

## खासगी रुग्णालयांच्या मनमानी बिलिंगला लगाम? केंद्राचा सर्वोच्च न्यायालयात दावा 'दरमर्यादेचा नियम घटनात्मकदृष्ट्या पूर्णपणे वैध!'

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

खासगी रुग्णालयांच्या उपचारांच्या नावाखाली रुग्णांच्या खिशावर चालणाऱ्या मनमानीला आता कायद्याचा लगाम बसणार का, हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. देशातील खासगी रुग्णालयांना केंद्र सरकारने निश्चित केलेल्या कमाल आणि किमान दरमर्यादेतच शुल्क आकारणे बंधनकारक करणारा नियम घटनात्मकदृष्ट्या पूर्णपणे वैध असल्याचा दावा केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रात केला आहे. मात्र, दर किती असावेत यावर केंद्र आणि राज्यांमध्ये अद्याप एकमत नसल्याने ही प्रक्रिया अंतिम टप्प्यात पोहोचलेली नाही, हीच या संपूर्ण व्यवस्थेची मोठी विसंगती आहे.

केंद्र सरकारच्या या भूमिकेमुळे खासगी आरोग्यसेवेतील दरनियमनाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. क्लिनिकल एस्टॅब्लिशमेंट्स (सेंट्रल गव्हर्नमेंट) नियम, २०१२ मधील नियम ९(२) ला ऑल इंडिया ऑप्थॅल्मोलॉजिकल सोसायटीने सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद असा आहे की, महानगरांमध्ये अत्याधुनिक सुविधा, महागडी उपकरणे आणि विशेष कौशल्य असलेल्या तज्ज्ञ डॉक्टरांनी लहान शहरांतील किंवा ग्रामीण भागातील सेवांप्रमाणेच शुल्क आकारावे, अशी सक्ती व्यावहारिकदृष्ट्या योग्य नाही.

पण इथे केंद्र सरकारचा युक्तिवाद वेगळा आहे. रुग्णालयांचे शुल्क ठरवताना राज्यांशी सल्लामसलत करून केंद्राने निश्चित केलेल्या मर्यादेचे पालन करणे आवश्यक आहे, असे सरकारने स्पष्ट केले आहे. या नियमामागे संविधानातील अनुच्छेद ४७ अंतर्भूत असलेल्या सार्वजनिक आरोग्य सुधारण्याच्या राज्याच्या कर्तव्याचा आधार घेण्यात आला आहे.

या प्रकरणाची गंभीरता एप्रिल २०२४ मधील सर्वोच्च न्यायालयाच्या सुनावणीदरम्यानही समोर आली होती. न्यायमूर्ती सुधांशू धुलिया आणि न्यायमूर्ती प्रसन्ना बी. वराळे यांच्या खंडपीठाने नमूद केले होते की, अनेक खासगी रुग्णालयांना गरीब रुग्णांसाठी खाटा राखीव ठेवण्याच्या अटीवर सवलतीच्या दरात जमीन मिळते. मात्र, प्रत्यक्षात ही अट कितपत पाळली जाते, यावरच न्यायालयाने प्रश्न उपस्थित केला होता.

म्हणजेच प्रश्न केवळ डॉक्टरांच्या शुल्काचा नाही; प्रश्न आहे आरोग्यसेवा ही नागरिकांची गरज आहे की परवडणाऱ्या लोकांसाठीच उपलब्ध असलेली महागडी बाजारपेठ?

## नीट-पीजीचा पुन्हा गोंधळ! परीक्षार्थींना चुकीच्या शहराचे एसएमएस; एनबीईएमएसच्या 'तांत्रिक कारणां'वर विद्यार्थ्यांचा विश्वास किती?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली / प्रतिनिधी**

नीट-पीजी २०२६ परीक्षेभोवतीचा गोंधळ थांबण्याचे नाव घेत नाही. परीक्षा केंद्रांबाबत आधीच तणावात असलेल्या हजारो विद्यार्थ्यांना आता चुकीच्या परीक्षा शहराची माहिती देणारे एसएमएस गेल्याने पुन्हा एकदा प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे. नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस अर्थात एनबीईएमएसने बुधवारी ही चूक मान्य करताना काही उमेदवारांना तांत्रिक कारणांमुळे चुकीच्या शहराची माहिती अनवधानाने पाठवली गेल्याचे स्पष्ट केले.

पण विद्यार्थ्यांचा प्रश्न साधा आहेपरीक्षेचे केंद्र आणि शहर ही माहितीच जर चुकीची पाठवली जात असेल, तर परीक्षा व्यवस्थेवर विश्वास कसा ठेवायचा? नीट-पीजीसारखी देशपातळीवरील अत्यंत महत्त्वाची प्रवेश परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी परीक्षा केंद्राचे शहर ही किरकोळ माहिती नाही. त्यानुसार प्रवास, रेल्वे किंवा विमानाचे तिकीट, हॉटेल, आर्थिक नियोजन आणि मानसिक तयारी केली जाते.

एनबीईएमएसने दिलेल्या माहितीनुसार, काही उमेदवारांना चुकीच्या शहराचे एसएमएस गेल्यानंतर योग्य परीक्षा शहराची माहिती देणारे नवीन एसएमएस आणि ई-मेल पाठवण्यात आले आहेत. तसेच उमेदवारांच्या अर्जदार पोर्टलवरही योग्य परीक्षा शहराचा तपशील उपलब्ध करून देण्यात आला आहे. नीट-पीजी २०२६ परीक्षा ३० ऑगस्ट २०२६ रोजी होणार आहे. त्यामुळे परीक्षेला अवघे काही आठवडे शिल्लक असताना अशी तांत्रिक चूक विद्यार्थ्यांसाठी अनावश्यक मानसिक आणि आर्थिक त्रास निर्माण करणारी ठरू शकते.

विशेष म्हणजे ही चूक 'तांत्रिक कारणांमुळे' झाली असे सांगून प्रकरण संपवणे पुरेसे ठरणार नाही. चुकीची माहिती किती उमेदवारांना गेली, त्याचा परिणाम किती विद्यार्थ्यांवर झाला आणि अशा चुका पुन्हा होऊ नयेत यासाठी नेमकी कोणती यंत्रणा उभारली आहे,

## राज ठाकरे भल्या सकाळी 'वर्षा'वर! फडणवीसांची अचानक भेट; सरकारवर टीका करणारे ठाकरे नेमके कोणता 'प्लॅन' घेऊन गेले?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई / वृत्तसंस्था**

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी बुधवारी सकाळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या अधिकृत निवासस्थानी 'वर्षा' बंगल्यावर अचानक भेट घेतल्याने महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. विशेष म्हणजे मागील काही दिवसांपासून ठाकरे सातत्याने राज्य सरकारवर आक्रमक टीका करत असताना ही भेट झाल्याने 'सरकारवर टीका आणि मुख्यमंत्र्यांशी भेट' या दोन्ही भूमिकांचा नेमका मेळ काय? असा प्रश्न उपस्थित होत आहे.

राज ठाकरे यांनी फडणवीस यांना पुष्पगुच्छ देऊन भेट घेतली. मात्र या भेटीमागील नेमका अजेंडा काय होता, दोन्ही नेत्यांमध्ये कोणत्या मुद्द्यांवर चर्चा झाली किंवा कोणते निर्णय झाले, याबाबत अद्याप अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

गेल्या काही दिवसांत राज ठाकरे यांनी मुंबई-गोवा महामार्गाची दुरवस्था, रस्त्यांवरील खड्डे, 'जेन-जी' आंदोलन आणि नाशिक दौऱ्यातील कुंभमेळा नियोजनावरून सरकारला धारेवर धरले होते. त्यामुळे महामार्ग आणि खड्ड्यांच्या प्रश्नावर थेट मुख्यमंत्र्यांकडे तोडगा मागण्यासाठी ही भेट झाली का, असा तर्क लावला जात आहे.

मात्र या भेटीतील आणखी एक उपस्थिती राजकीय चर्चेला वेगळे वळण देत आहे. मुंबई क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अजिंक्य नाईक हेही राज ठाकरे यांच्यासोबत 'वर्षा'वर उपस्थित होते. काही दिवसांपूर्वीच ठाकरे यांनी शिवाजी पार्क मैदानाच्या दुरवस्थेवर प्रश्न उपस्थित केला होता. त्यामुळे शिवाजी पार्कचा विकास, नवीन क्रीडा सुविधा किंवा स्टेडियमसंदर्भातील एखादा प्रस्ताव मुख्यमंत्र्यांसमोर मांडला गेला का? याचीही चर्चा सुरू झाली आहे.

## अमित शाह संसदेला सामोरे जाऊ शकत नाहीत! राहुल गांधींचा घणाघात; विद्यार्थ्यांवरील कारवाईवरून राजीनाम्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली : प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित लाठीचार्ज आणि पॅलेट गन्सच्या वापरावरून राजकीय संघर्ष आता आणखी तीव्र झाला आहे. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर थेट निशाणा साधत देशाचे गृहमंत्री संसदेला सामोरे जाण्याचे धाडस दाखवू शकत नाहीत असा घणाघाती आरोप केला आहे. विद्यार्थ्यांवरील कारवाईची नैतिक जबाबदारी स्वीकारून अमित शाह यांनी तात्काळ राजीनामा द्यावा, अशी मागणीही त्यांनी केली.

राहुल गांधी यांनी सरकारसमोर प्रश्नांची सरबत्ती केली आहे. विद्यार्थ्यांवर पॅलेट गन्सचा वापर करण्याचे आदेश कोणी दिले? एका विद्यार्थ्याच्या डोळ्याला आणि दुसऱ्याच्या कानाला गंभीर दुखापत होण्यास कारणीभूत ठरलेली कारवाई नेमकी कोणाच्या आदेशाने झाली? खिळे लावलेल्या लाठ्यांचा वापर करण्याचे निर्देश कोणी दिले? या प्रश्नांची स्पष्ट उत्तरे सरकारने द्यावीत, अशी मागणी त्यांनी केली. दिल्ली पोलीस आणि केंद्रीय गृह मंत्रालयाच्या अखत्यारितील यंत्रणांमधून हे आदेश दिले गेले असतील, तर त्याची जबाबदारी थेट गृहमंत्र्यांवर येते, असा राहुल गांधींचा दावा आहे. आदेश अमित शाह यांनी दिले असतील तर ते जबाबदार आहेत; आदेश दिले नसतील तरी यंत्रणा नियंत्रित करण्यात अपयशी ठरल्यामुळे त्यांनी राजीनामा द्यावा, अशी आक्रमक भूमिका त्यांनी घेतली. राहुल गांधींच्या आरोपानुसार, अमित शाह तब्बल वीस दिवस या प्रकरणावर सार्वजनिकपणे पुढे आले नाहीत. संसदेत उपस्थित असूनही त्यांनी सभागृहाला सामोरे जाणे टाळल्याचा आरोप राहुल गांधी यांनी केला. विद्यार्थ्यांचा रोष रोखण्यासाठी त्यांच्या निवासस्थानाबाहेर मोठ्या प्रमाणात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आल्याचाही दावा त्यांनी केला. युवा पिढीला भाषणे किंवा प्रवचने नकोत, तर घडलेल्या घटनांचे सत्य आणि जबाबदार व्यक्तींची नावे हवी आहेत, असे राहुल गांधी म्हणाले. त्यामुळे आता केंद्र सरकारसमोर केवळ राजकीय टीकेचे उत्तर देण्याचे नव्हे, तर विद्यार्थ्यांवरील कारवाईबाबत पारदर्शक स्पष्टीकरण देण्याचे आव्हान आहे.

संसद ही जनतेच्या प्रश्नांना उत्तर देण्याची सर्वोच्च राजकीय जागा आहे. गृहमंत्रीच जर या प्रश्नांपासून दूर राहिले, तर जबाबदारी कोणाची? हा प्रश्न राहुल गांधींच्या हल्ल्यानंतर पुन्हा केंद्रस्थानी आला आहे.

# पाम ऑइल प्रकल्पाचा 'प्लॅन' फसला; पतंजलीला तेलंगणातून धक्का

### २४ महिन्यांत कारखाना सुरू करण्याची अट पाळली नाही; उच्च न्यायालयाने सरकारचा निर्णय कायम ठेवला, मात्र सर्वोच्च न्यायालयाच्या 'जैसे थे' आदेशामुळे पुढील हस्तांतरणाला ब्रेक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**हैदराबाद । प्रतिनिधी**

मोठमोठ्या घोषणा, सरकारी सवलती आणि जमीनवाटप मिळाल्यानंतरही प्रत्यक्ष प्रकल्प उभा करण्यात अपयश आले, तर सरकारची जमीन किती काळ उद्योगाच्या नावावर रोखून ठेवायची? हा मूलभूत प्रश्न तेलंगणातील पतंजली फूड्स लिमिटेडच्या पाम ऑइल प्रकल्पाच्या प्रकरणातून समोर आला आहे. पाम ऑइल प्रक्रिया कारखाना उभारण्याच्या अटी पूर्ण न केल्यामुळे तेलंगणा सरकारने पतंजली फूड्सला दिलेले 'झश्रा जळश्र ऋरलींऑू नेपश' रद्द केले. तेलंगणा उच्च न्यायालयानेही सरकारचा निर्णय योग्य ठरवत कंपनीचे अपील फेटाळले.

राष्ट्रीय खाद्यतेल-पाम तेल मिशन (NMEO-OP) अंतर्गत नलगोंडा आणि सूर्यापेट जिल्ह्यांत पतंजली फूड्सला जमीन उपलब्ध करून देण्यात आली होती. या जमीनवाटपामागे स्पष्ट उद्देश होतापामची लागवड वाढवणे, प्रक्रिया उद्योग उभारणे आणि शेतकऱ्यांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे. मात्र, करारातील अटी पूर्ण करण्याच्या बाबतीत कंपनीची कामगिरी अपेक्षेप्रमाणे झाली नाही.

**२४ महिन्यांची मुदत, पण कारखाना कुठे?**

करारातील सर्वात महत्त्वाची अट म्हणजे जमीन मिळाल्यानंतर २४ महिन्यांच्या आत पाम ऑइल प्रक्रिया कारखाना सुरू करणे. ही केवळ औपचारिक अट नव्हती; प्रकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी सरकारने जमीन देताना घातलेली मूलभूत अट होती.

मात्र निर्धारित मुदतीत कारखाना सुरू झाला नाही. एवढेच नव्हे, तर सूर्यापेट जिल्ह्यातील पाम लागवडीचे उद्दिष्टही केवळ १४ टक्के पूर्ण झाल्याचे सरकारच्या भूमिकेतून स्पष्ट झाले. त्यामुळे सरकारने जमीनवाटप रद्द करण्याचा निर्णय घेतला.

**शेवटच्या क्षणी हालचाली; न्यायालयाने दिला स्पष्ट संदेश**

कंपनीने आपल्या बाजूने जमीन खरेदी आणि आवश्यक परवानग्यांसाठी केलेल्या प्रयत्नांचा दाखला दिला. मात्र उच्च न्यायालयाने या युक्तिवादाला पुरेसे महत्त्व दिले नाही. मुख्य न्यायमूर्ती अलोके अराधे आणि न्यायमूर्ती जे. श्रीनिवास राव यांच्या खंडपीठाने करारातील मूलभूत अटी वेळेत पूर्ण न झाल्याचे अधोरेखित केले.

न्यायालयाचा संदेश स्पष्ट आहेकरारातील मुदत संपल्यानंतर शेवटच्या क्षणी केलेल्या हालचालींमुळे आधी झालेला नियमभंग आपोआप माफ होत नाही. सरकारी जमीन किंवा प्रोत्साहन योजना मिळाल्यानंतर केवळ कागदोपत्री हालचाली न करता प्रत्यक्ष प्रकल्प उभारणे आवश्यक आहे.

**पतंजलीला 'बाहेरचा रस्ता', पण अंतिम निर्णय बाकी**

उच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तेलंगणा सरकारने ही जमीन सरकारी संस्था 'टीजी ऑईलफेड'कडे देण्याची तयारी केली. त्यामुळे पतंजली फूड्सचा या प्रकल्पातील सहभाग जवळपास संपुष्टात आल्याचे चित्र निर्माण झाले.

मात्र, प्रकरणाला सर्वोच्च न्यायालयाने वेगळे वळण दिले आहे. सर्वोच्च न्यायालयाने पुढील सुनावणीपर्यंत जमीनवाटपाबाबत 'जैसे थे' स्थिती कायम ठेवण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे सरकारला सध्या ही जमीन इतर कोणत्याही संस्थेकडे हस्तांतरित करता येणार नाही.

**घोषणांपेक्षा कामगिरी महत्त्वाची**

पतंजलीशी संबंधित हा वाद केवळ एका कंपनीला जमीन मिळाली किंवा परत घेतली, एवढ्यापुरता मर्यादित नाही. सरकारी जमीन, उद्योगांसाठीच्या सवलती आणि शेतकरी-केंद्रित योजनांमध्ये 'परफॉर्म करा किंवा जमीन परत द्या' हा मूलभूत नियम किती महत्त्वाचा आहे, याकडे या प्रकरणाने लक्ष वेधले आहे.

सरकारकडून जमीन मिळवताना प्रकल्पाचे आश्वासन देणे सोपे; पण त्या आश्वासनाची वेळेत पूर्तता करणे ही खरी कसोटी. पतंजली फूड्सच्या बाबतीत २४ महिन्यांत कारखाना सुरू न होणे आणि पाम लागवडीचे उद्दिष्ट अत्यल्प प्रमाणात पूर्ण होणे, यामुळे कंपनीच्या कामगिरीवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उद्योगाला जमीन देणे ही सरकारची उदारता असू शकते; पण त्या जमिनीवर उद्योग उभा करणे ही कंपनीची जबाबदारी आहे. कामगिरी नसेल तर सरकारी जमीन कायमस्वरूपी कोणाच्या ताब्यात ठेवायची, हा प्रश्न आता केवळ तेलंगणाचा नाहीदेशातील सर्व औद्योगिक जमीनवाटप धोरणांसमोर उभा राहिला आहे.

## संपादकीय

### अमित शाह स्पष्ट का बोलत नाहीत? उत्तरांची तयारी की प्रश्न टाळण्याची रणनीती?

अमित शाह यांनी संसदेत विरोधकांच्या प्रत्येक प्रश्नाला उत्तर देण्याची तयारी दर्शवली आहे. विद्यार्थ्यांच्या आंदोलनावर झालेल्या कथित पोलिस कारवाईबाबत चर्चा करण्यासाठी ते २४ तास उपलब्ध राहण्याची तयारी असल्याचे त्यांनी बुधवारी सांगितले. विरोधकांनी मात्र चर्चेऐवजी थेट उत्तरांची मागणी केली आहे. याच ठिकाणी मूळ प्रश्न निर्माण होतो-अमित शाह प्रश्नांची उत्तरे देण्यास तयार आहेत, तर नेमका प्रश्न कोणता आहे यावर स्पष्ट भूमिका का घेत नाहीत? राहुल गांधी यांचा आक्षेपही याच मुद्द्यावर आहे. त्यांना संसदेत एखादे सर्वसाधारण भाषण किंवा राजकीय व्याख्यान नको आहे; विद्यार्थ्यांवर झालेल्या कथित कारवाईबाबत नेमका आदेश कोणी दिला, कारवाईची जबाबदारी कोणाची आणि सरकारची भूमिका काय होती, याचे स्पष्ट उत्तर हवे आहे. लोकशाहीत चर्चा महत्त्वाची आहे; पण चर्चेच्या नावाखाली मूळ प्रश्न धूसर होणे अधिक धोकादायक आहे. विरोधकांचा प्रश्न जर विशिष्ट असेल, तर सरकारचे उत्तरही तितकेच विशिष्ट असायला हवे. आम्ही प्रत्येक प्रश्नाचे उत्तर देऊ ही राजकीयदृष्ट्या प्रभावी घोषणा आहे; परंतु त्यानंतर होय किंवा नाही, आदेश दिला किंवा दिला नाही, जबाबदारी स्वीकारणार की नाही, अशा स्पष्ट उत्तरांची वेळ येते. सध्या सरकार आणि विरोधक यांच्यातील संघर्ष केवळ संसद चालवण्याचा नाही; तो राजकीय जबाबदारीच्या अर्थावरून आहे. अमित शाह चर्चेसाठी तयार असल्याचे सांगतात, तर राहुल गांधी म्हणतात की लेक्चर ऐकण्यात रस नाही. दोन्ही बाजूंच्या या भूमिकांमागे राजकीय गणित असू शकते. सरकारला संसदेत व्यापक चर्चेत आपली बाजू मांडण्याची संधी हवी आहे; विरोधकांना मात्र चर्चेचा केंद्रबिंदू बदलू द्यायचा नाही. मात्र या संघर्षात सर्वात महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थी. त्यांच्या आंदोलनावर पोलिसांनी कोणती कारवाई केली, ती कोणत्या आदेशाने केली, कोणत्या परिस्थितीत केली आणि त्या कारवाईची चौकशी झाली का-या प्रश्नांची उत्तरे राजकीय आरोप-प्रत्यारोपांपेक्षा अधिक महत्त्वाची आहेत. अमित शाह यांनी ३ वाजल्यापासून दुसऱ्या दिवशी ३ वाजेपर्यंत संसदेत उपलब्ध राहण्याची तयारी दाखवली, ही बाब चर्चेसाठी सकारात्मक पाऊल मानता येईल. पण वेळ देणे आणि उत्तर देणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. २४ तास उपलब्ध राहण्यापेक्षा २४ स्पष्ट उत्तरे देणे अधिक महत्त्वाचे आहे. राहुल गांधींच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित होऊ शकतात. सरकार चर्चा करण्यास तयार असताना विरोधकांनी ती नाकारण्याऐवजी संसदेत ठोस प्रश्न मांडून उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करणे अधिक परिणामकारक ठरू शकते. कारण लोकशाहीत प्रश्न विचारणे जितके महत्त्वाचे, तितकेच मिळालेले उत्तर जनतेसमोर तपासणेही महत्त्वाचे आहे. पण सरकारकडूनही अपेक्षा अधिक आहे. गृह मंत्रालयाच्या अखत्यारीतील पोलिस कारवाईवर प्रश्न उपस्थित झाले असतील, तर जबाबदारीपासून दूर जाण्याऐवजी स्पष्ट तथ्ये, आदेशांची साखळी आणि कारवाईची अधिकृत माहिती संसदेसमोर ठेवणे ही सरकारची जबाबदारी आहे. आजचा खरा प्रश्न त्यामुळे अमित शाह संसदेत बोलणार का? हा नाही. खरा प्रश्न आहे-अमित शाह नेमके काय स्पष्ट करणार? राजकीय भाषणे, आरोप-प्रत्यारोप आणि घोषणांपलीकडे जाऊन जर सरकारने प्रत्येक गंभीर प्रश्नाचे तथ्याधारित उत्तर दिले, तर संसदेतला गोंधळ कमी होऊ शकतो. अन्यथा उत्तर देण्याची तयारी ही केवळ राजकीय रणनीती म्हणून पाहिली जाईल. लोकशाहीत जनतेला भाषण नको असते; तिला सत्य हवे असते. आणि म्हणूनच अमित शाह यांनी प्रश्नांना उत्तर देण्यापूर्वी नव्हे, तर प्रश्नाच्या केंद्रस्थानी असलेल्या मुद्द्यावर स्पष्ट भूमिका मांडणे गरजेचे आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला वेग

## चिंचवड, पिंपरी आणि भोसरी विधानसभा मतदारसंघातील मतदारांसाठी महापालिकेचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड । प्रतिनिधी

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार पिंपरी-चिंचवड शहरातील २०५ चिंचवड, २०६ पिंपरी (अ.जा.) आणि २०७ भोसरी विधानसभा मतदारसंघांतील मतदार यादी अद्ययावत व अचूक करण्यासाठी विशेष सखोल पुनरिक्षण (ड्खठ) मोहिमेला सुरुवात झाली आहे. या मोहिमेत पात्र मतदारांची नावे मतदार यादीत समाविष्ट करण्यासाठी नागरिकांनी आवश्यक माहिती देऊन प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन पिंपरी-चिंचवड महापालिकेने केले आहे.

महापालिकेच्या माहिती व जनसंपर्क विभागाने प्रसिद्ध केलेल्या पत्रानुसार, या मोहिमेअंतर्गत १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत बूथ लेव्हल ऑफिसर (इड्ज) यांच्यामार्फत 'एऱ फॉर्म'चे वाटप व स्वीकृती सुरू आहे. शहरातील विविध क्षेत्रांत कार्यरत नामांकित व्यक्ती, उद्योजक, साहित्यिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार, इलेक्ट्रॉनिक मीडिया प्रतिनिधी तसेच कला व क्रीडा क्षेत्रातील व्यक्तींची नावे मतदार यादीत समाविष्ट असणे आवश्यक असल्याने त्यांनाही या प्रक्रियेत सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



मतदार यादीसाठी सुधारित कार्यक्रम

निवडणूक आयोगाने मतदार यादीच्या विशेष सखोल पुनरिक्षणासाठी सुधारित कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत इड्ज मार्फत 'एऱ फॉर्म'चे वाटप व स्वीकृती करण्यात येत आहे. यानंतर २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत प्रारूप मतदार यादीवरील दावे व हरकती स्वीकारल्या जाणार आहेत. त्यानंतर दावे-हरकतींवर प्रक्रिया करून अंतिम मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येणार आहे.


आयोगाच्या वेळापत्रकानुसार २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध केली जाणार आहे. महापालिकेने नागरिकांना आवाहन केले आहे की, संबंधित मतदाराचे नाव मतदार यादीत समाविष्ट आहे की नाही, याची खात्री करावी. नाव नसल्यास किंवा आवश्यक दुरुस्ती असल्यास विहित मुदतीत संबंधित इड्ज किंवा जवळच्या क्षेत्रीय कार्यालयाशी संपर्क साधावा.

मतदार यादीत पात्र नागरिकाचे नाव समाविष्ट राहावे आणि कोणताही मतदार मतदानाच्या अधिकारापासून वंचित राहू नये, यासाठी नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन अतिरिक्त आयुक्त विक्रांत बागडे यांनी केले आहे.

# किवळेतील सेवा रस्त्याच्या कामाची गुणवत्ता तपासा

## निकृष्ट कामामुळे नागरिकांना त्रास; खड्डे, पाणी साचण्यासह अंडरपासच्या कामाबाबतही तक्रारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी-चिंचवड : प्रतिनिधी



पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतून जाणाऱ्या मुंबई-बंगळुरू महामार्गावरील (देहूरोड-कात्रज बाह्यवळण मार्ग) मामुर्डी ते वाकडदरम्यान सुरू असलेल्या सेवा रस्त्याच्या कामाच्या गुणवत्तेची तपासणी करण्याची मागणी खासदार श्रीरंग बारणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे केली आहे.

मावळ लोकसभा मतदारसंघातील देहूरोड बायपासपासून किवळे, रावेतमार्गे वाकडपर्यंत राष्ट्रीय महामार्गाचे बांधकाम डीएमआर इन्फ्रा या ठेकेदारामार्फत सुरू आहे. मात्र, स्थानिक नागरिक आणि लोकप्रतिनिधींकडून या कामाच्या गुणवत्तेबाबत सातत्याने तक्रारी प्राप्त होत असल्याचे खासदार बारणे यांनी गडकरी यांच्या निदर्शनास आणून दिले.

विशेषतः किवळे जंक्शन येथे दोन्ही बाजूंना बांधण्यात आलेल्या अंडरपासच्या कामाबाबतही तक्रारी आहेत. रस्ते बांधकामासाठी आवश्यक मानकांचे पालन झाले नसल्यामुळे अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे निर्माण झाले आहेत. तसेच पावसाच्या पाण्याचा निचरा करण्यासाठी आवश्यक असलेली स्टॉर्म वॉटर ड्रेनेज व्यवस्था योग्य प्रकारे करण्यात आलेली नसल्याने पावसाचे पाणी रस्त्यावर साचत आहे.

पाणी साचल्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. सर्व्हिस रोडची अवस्थाही खराब असल्याने वाहनचालक आणि स्थानिक नागरिकांना मोठ्या गैरसोयीचा सामना करावा लागत असल्याचे बारणे यांनी सांगितले.

या मार्गावर सुमारे ८.२५ किलोमीटर लांबीच्या एलिव्हेटेड रोडचे बांधकाम प्रस्तावित आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेल्या कामाची गुणवत्ता तपासणे आणि आवश्यक त्या सुधारणा तातडीने करणे गरजेचे असल्याची मागणी खासदार बारणे यांनी केली आहे.

दरम्यान, नागरिकांच्या तक्रारींची दखल घेऊन संबंधित यंत्रणेने प्रत्यक्ष पाहणी करून रस्ते, अंडरपास आणि पावसाच्या पाण्याच्या निचरा व्यवस्थेची गुणवत्ता तपासावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

# भटक्या श्वानांसाठी पुणे पालिका रोज देणार १०३ रुपये

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पुणे : प्रतिनिधी

शहरातील भटक्या व मोकाट श्वानांच्या व्यवस्थापनासाठी पुणे महापालिकेने आता ॲनिमल वेल्फेअर संस्थांच्या सहकार्याने खासगी शेल्टरची मदत घेण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका हद्दीत किंवा हद्दीबाहेर स्वतःच्या अथवा भाडेतत्त्वावरील जागेत शेल्टर उभारून भटक्या श्वानांची देखभाल करण्यासाठी ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया मान्यताप्राप्त संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. शेल्टरमध्ये ठेवण्यात येणाऱ्या प्रत्येक श्वानासाठी महापालिकेकडून प्रतिदिन १०३ रुपये देण्यात येणार आहेत.

कुत्र्यांच्या हल्ल्याच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने केंद्र सरकारला देशभर एकसमान कार्यपद्धती तयार करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार शाळा, महाविद्यालये, रुग्णालये, क्रीडा संकुले, बसस्थानके, रेल्वे स्थानके यांसह सार्वजनिक संस्थांच्या आवारात भटक्या कुत्र्यांचा वावर आणि नागरिकांवरील हल्ले रोखण्यासाठी केंद्र सरकारने प्रमाणित कार्यपद्धती जारी केली आहे. सार्वजनिक संस्थांच्या आवारात आढळणाऱ्या भटक्या कुत्र्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मदतीने पकडून त्यांचे निर्बीजीकरण व लसीकरण करून निवारा केंद्रात हलविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

या आदेशांच्या अनुषंगाने महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने खासगी शेल्टरची व्यवस्था करण्यासाठी जाहीर निवेदन प्रसिद्ध केले आहे. एका शेल्टरमध्ये जास्तीत जास्त १०० भटके श्वान ठेवता येणार असून, त्यासाठी सुमारे ७० फूट बाय ४० फूट जागेत आवश्यक पायाभूत सुविधा उभारणे अपेक्षित आहे. महापालिकेच्या गरजेनुसार शेल्टरची संख्या निश्चित केली जाणार असून, पात्र संस्थांना पाच वर्षांच्या कालावधीसाठी शेल्टर चालविण्याची जबाबदारी देण्यात येणार आहे.

शेल्टरमध्ये श्वानांची देखभाल करताना ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाच्या मानक कार्यपद्धतीचे काटेकोर पालन करणे संस्थांना बंधनकारक राहणार आहे.


# नाट्यगृहांचे ऑनलाइन बुकिंग; मात्र बिलावरील जीएसटी क्रमांक गायब

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी

पिंपरी-चिंचवड महापालिकेने ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देताना नाट्यगृहांचे बुकिंग ऑनलाइन केले आहे. मात्र शहरातील पाच नाट्यगृहे आणि सभागृहांत होणाऱ्या कार्यक्रमांच्या भाडे बिलावरील जीएसटी क्रमांक गायब झाला आहे. त्यामुळे जीएसटीचा लाभ विविध संस्थांना घेता येत नाही. याबाबत महापालिका प्रशासनाकडे तक्रार करूनही त्याकडे दुर्लक्ष केले जात असल्याच्या तक्रारी आहेत.

महापालिका परिसरात चिंचवड येथे प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह, आकुर्डी प्राधिकरण येथे ग. दि. माडगूळकर सभागृह, संत तुकाराम नगर येथे आचार्य अत्रे रंगमंदिर सभागृह, भोसरी येथे कै. अंकुश लांडगे सभागृह नाट्यगृह आणि पिंपळे गुरव येथे नटसम्राट निळू फुले नाट्यगृह आहेत.

नाट्यगृहांमध्ये नाटक, सांस्कृतिक कार्यक्रम, संगीत सभा, पुरस्कार वितरण सोहळे, स्नेहसंमेलन असे विविध सांस्कृतिक, शैक्षणिक, सामाजिक आणि राजकीय आणि राजकीय कार्यक्रम होत असतात. त्यासाठी महापालिकेच्या वतीने भाडे आकारण्यात येते. यामध्ये प्रेक्षागृहाचे भाडे, डिपाल शुल्क, फलक शुल्क त्याचबरोबर १८ टक्के जीएसटी आकारला जातो. मात्र विविध संस्थांना देण्यात येणाऱ्या बिलांवर जीएसटी क्रमांक नसतो. त्यामुळे नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. संस्थाचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे.



### जीएसटी रिफंड मिळण्यात अडथळे

नाट्यगृहासाठी वेगवेगळ्या ठिकाणी प्रशासन, कर्मचारी, लिपिक नियुक्त केले जातात. त्याठिकाणी कर्मचारी व्यवस्थित माहिती देत नसल्याच्या तक्रारी आहेत. जीएसटीच्या रकमेबाबत विचारणा केली असता ते वरिष्ठ अधिकाऱ्यांचे नाव सांगून जबाबदारी टाळत आहेत. सीजीएसटी आणि एसजीएसटी असा एकूण अठरा टक्के कर आकारला जात आहे. बिलावर जीएसटी क्रमांक नाही, त्यामुळे संबंधित संस्थांना त्रास सहन करावा लागत आहे. जीएसटी रिफंड मिळत नाही.

# बांधकाम व्यावसायिकाची फ्लॅटधारकांची २७ लाखांची फसवणूक; चिंचवड पोलिसांत गुन्हा दाखल

■ दैनिक राज्य लोकतंत्र
पिंपरी : प्रतिनिधी

बांधकामाच्या जागेचा विकास करून देण्याचे अमिष दाखवून आणि नंतर झालेला व्यवहार रद्द करून फ्लॅटधारकांची २५ लाख ५० हजार रुपये मूळ रक्कम व उर्वरित भरपाई न देता तब्बल २७ लाख ५० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी अमोल रावसाहेब गायकवाड (वय ३८, रा. बोहाडे वाडी, मोशी) या बांधकाम व्यावसायिकावर चिंचवड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत शारदा अभिजीत पवार (वय ३३, रा. मोरेया कॉलनी, रहाटणी) यांनी चिंचवड पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना नोव्हेंबर २०२३ ते ११ ऑगस्ट २०२६ या कालावधीत जुना जकात नाका, चिंचवड येथील 'डी.एस. डेव्हलपर्स'च्या कार्यालयात घडली.

पोलीस माहितीनुसार, आरोपी अमोल गायकवाड याने फिर्यादी व त्यांच्या भागीदारांना त्यांच्या मालकीच्या जागेवर एकत्र प्रोजेक्ट डेव्हलप करण्याचे सांगितले. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादी व त्यांच्या साथीदारांनी एकूण २७,५०,००० रुपये ऑनलाईनद्वारे आरोपीच्या खात्यात पाठवले. मात्र, आरोपीने दिलेल्या मुदतीत कोणतीही जागा विकसित केली नाही.

त्यानंतर दोन्ही बाजूंच्या संमतीने व्यवहार रद्द करण्यात आला. आरोपीने फिर्यादींना २५,५०,००० रुपये परत देण्याचे व नुकसानभरपाईपोटी १,५०,००० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. त्यापैकी आरोपीने केवळ ५,५०,००० रुपये परत केले, तर उर्वरित ११,०५,००० रुपये देण्यास टाळाटाळ करून फिर्यादीची आर्थिक फसवणूक केली. चिंचवड पोलीस पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक जाधव करत आहेत.

**शेअर मार्केट आणि आयपीओच्या नावाखाली तब्बल ८३ लाखांचा गंडा; सायबर पोलिसांत गुन्हा**

**पिंपरी-चिंचवड :**

परदेशी शेअर मार्केट, स्टॉक मार्केट आणि आयपीओमध्ये पैसे गुंतवल्यास तब्बल ५०० टक्के नफा मिळवून देण्याचे अमिष दाखवून एका तरुणाला तब्बल ८३ लाख ६० हजार रुपयांचा गंडा घातल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलीस ठाण्यात विविध बँक खातेदार आणि अज्ञात सायबर चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत नावेद जुबेद चौधरी (वय २२, रा. शिवतेज नगर, चिखली) यांनी फिर्याद दिली आहे. ही घटना २ फेब्रुवारी २०२६ ते ६ जून २०२६ दरम्यान घडली.

पोलीस माहितीनुसार, सायबर चोरट्यांनी फिर्यादीला व्हॉट्सॲपवर बनावट लिंक्स (https://m.falcon-glo.com/currencyPay आणि SEBI ची बनावट लिंक) पाठवून बनावट प्रमाणपत्रे दाखवली. त्यावर विश्वास ठेवून फिर्यादीने सुरुवातीला ८,३०,००० रुपये गुंतवले. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीला तब्बल २० लाख अमेरिकन डॉलर (USD) नफा झाल्याचे बनावट डॅशबोर्डवर दाखवले.

हा नफा काढायचा असल्यास कन्व्हर्जन फी, फायलिंग फी, कॅपिटल गेन टॅक्स, इन्शुरन्स फी, परवाना फी, जीएसटी चार्जेस आणि ब्रोकरेज अशा विविध कारणांसाठी आरोपींनी विविध बँक खात्यांमध्ये एकूण ८३ लाख ६० हजार रुपये भरण्यास भाग पाडले. पैसे भरल्यानंतरही कोणताही नफा किंवा मूळ रक्कम परत न मिळाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. पोलीस निरीक्षक गायकवाड या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### आंबेगाव तालुका कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवारी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी ।प्रतिनिधी**

आंबेगाव तालुका कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघटनेची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दि. १५ ऑगस्ट रोजी मंचर येथील महात्मा गांधी विद्यालय व ज्युनिअर कॉलेज येथे दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या वार्षिक सभेस तालुक्यातील संघटनेचे सर्व पदाधिकारी व सभासद शिक्षकांनी उपस्थित राहावे, असे आवाहन तालुका संघटनेचे अध्यक्ष प्रा. सुनील थोरात यांनी केले आहे.

दरम्यान, संघटनेच्या कामकाजासाठी वार्षिक वर्गणी जमा करण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.

विभाग प्रमुखांनी आपल्या शाखेतील सर्व शिक्षकांकडून प्रत्येकी १०० रुपये वार्षिक वर्गणी जमा करावी, असे संघटनेचे सरचिटणीस प्रा. आर. आर. तनपूरे यांनी सांगितले.

वार्षिक सर्वसाधारण सभेत संघटनेच्या विविध विषयांवर चर्चा होणार असून, शिक्षकांच्या प्रश्नांबाबतही विचारविनिमय होण्याची शक्यता आहे.

# जारकरवाडी प्राथमिक शाळेचा शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्यात डंका

## पाच विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय चमकदार कामगिरी; सातवीच्या विद्यार्थिनीची तालुक्यात तृतीय क्रमांकावर झेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी। प्रतिनिधी**

जारकरवाडी (ता. आंबेगाव) येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. सन २०२६ मध्ये झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत इयत्ता चौथीचे पाच विद्यार्थी आणि इयत्ता सातवीची एक विद्यार्थिनी पात्र ठरली आहे. विशेष म्हणजे, इयत्ता चौथीतील विद्यार्थिनीने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावल्याने शाळेच्या यशात आणखी भर पडली आहे.

इयत्ता चौथीतील लावण्या महेश वनवे हिने २७६ गुण मिळवत जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावला. शरण्या संदीप वैद्य हिने २६४ गुण मिळवत जिल्ह्यात सातवा, स्वरा सुरज लबडे हिने २५८ गुण मिळवत दहावा, संस्कृती एकनाथ भोजने हिने २५६ गुण मिळवत अकरावा, तर संस्कृती विशाल भांड हिने २५२ गुण मिळवत जिल्ह्यात तेरावा क्रमांक मिळवला.

इयत्ता सातवीतील भावना संदीप भोजने हिने २०२ गुण मिळवत तालुक्यात तृतीय क्रमांक पटकावला. या यशामुळे जारकरवाडी शाळेच्या




शैक्षणिक गुणवत्तेची जिल्हास्तरावर दखल घेतली गेली आहे.

इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांना रेखा सुनील वळसे यांनी मुख्य मार्गदर्शक म्हणून मार्गदर्शन केले. इयत्ता सातवीच्या विद्यार्थिनीला सुदर्शन गंगाधर रासकर आणि गोरक्ष विष्णू उकिरडे यांनी मार्गदर्शन व सहकार्य केले. तसेच गंगुबाई वळसे, उज्वला नंदकुमार लंगडे, सुनीता गोपाळ रोडे आणि अशोक नामदेव किर्वे यांनीही विद्यार्थ्यांना सहकार्य केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शिक्षकांचे मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची मेहनत महत्त्वाची ठरली असल्याचे मुख्याध्यापक अब्दुलरहीमान जलील इनामदार व शिवाजी मारुती चासकर यांनी सांगितले.

शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या विद्यार्थ्यांसह त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे केंद्रप्रमुख मच्छिंद्र काळे, विस्तार अधिकारी कल्पना टाकळकर, गटविकास अधिकारी प्रमिला वाळूंज आणि गटशिक्षण अधिकारी रूपाली धोका यांनी अभिनंदन केले.

तसेच शालेय व्यवस्थापन समिती, पालकवर्ग, ग्रामपंचायत आणि विविध सामाजिक संस्थांच्या वतीने यशस्वी विद्यार्थी व शिक्षकांचे कौतुक करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे जारकरवाडी परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## शिरदाळे येथे जनावरांचे आरोग्य शिबिर संपन्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी । प्रतिनिधी**

शिरदाळे (ता. आंबेगाव) येथे पशुवैद्यकीय आरोग्य विभाग तसेच धामणी केंद्राच्या वतीने जनावरांचे आरोग्य शिबिर घेण्यात आले. या शिबिरात पशुपालकांना जनावरांसाठी जंतनाशक औषधे तसेच मिनरल मिक्सरचे मोफत वाटप करण्यात आले.

जंतनाशक औषधांमुळे जनावरांच्या पोटातील जंतांचे निर्मूलन होण्यास मदत होणार असून, मिनरल मिक्सरमुळे जनावरांचे आरोग्य सुधारण्यास तसेच दूध उत्पादन वाढण्यास मदत होणार आहे. गाईंची माज धरण्याची क्षमता आणि एकूण पशुधनाचे आरोग्य सुधारण्यासाठी संतुलित




आहार व खनिजांचे महत्त्व यावेळी पशुपालकांना समजावून सांगण्यात आले. शिबिरामुळे ग्रामस्थ आणि विशेषतः पशुपालकांनी समाधान व्यक्त केले.

यावेळी डॉ. संजय पांडे यांनी पशुपालकांना मार्गदर्शन केले. जनावरांचे नियमित आरोग्य तपासणी व लसीकरण, रोगप्रतिबंधक उपाययोजना, संतुलित आहार, गोठ्याची स्वच्छता तसेच दूध उत्पादन वाढीसाठी आवश्यक उपाययोजनांबाबत त्यांनी माहिती दिली.

या वेळी शिरदाळे गावचे माजी उपसरपंच मयूर सरडे, सोसायटी संचालक सुहास रणपिसे, दुग्धव्यवसायिक स्वप्नील तांबे, माऊली कृपा डेअरीचे चेअरमन भूपेंद्र तांबे, अनिकेत चौधरी, प्रगतशील शेतकरी संदीप मिंडे, राघू रणपिसे, कुणाल तांबे, ओम रणपिसे यांच्यासह अनेक शेतकरी व दुग्धव्यवसायिक उपस्थित होते.

## संतदास उपाख्य हभप पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांना राज्यस्तरीय संत तुकाराम महाराज साहित्य गौरव

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आळंदी । प्रतिनिधी**

संस्कृत, हिंदी आणि मराठी या तिन्ही भाषांमधील साहित्यिक योगदानाची दखल घेत संतदास उपाख्य हभप पुरुषोत्तम महाराज हिंगणकर यांना 'राज्यस्तरीय संत तुकाराम महाराज गौरव पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. केएसआय पब्लिकेशन, कोल्हापूर यांच्या वतीने येत्या २३ ऑगस्ट २०२६ रोजी आळंदीत आयोजित साहित्य संमेलनात हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

केएसआय पब्लिकेशनचे अध्यक्ष व साहित्यिक विलास पाटील इंगळीकर यांच्यासह विविध साहित्यिक आणि मान्यवरांच्या हस्ते हिंगणकर महाराज यांचा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्यानंतर त्यांच्या चाहत्यांकडून दूरध्वनी तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

हभप पुरुषोत्तम महाराज हिंगणकर हे कीर्तनकार आणि प्रवचनकार म्हणूनही परिचित आहेत. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी जोग महाराज वारकरी शिक्षण संस्थेत वारकरी शिक्षण घेतले. त्यानंतर हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश, ऋषिकेश आणि हरिद्वार येथे संस्कृत भाषेतील पाणिनी व्याकरणशास्त्राचा सखोल अभ्यास केला. वारकरी संप्रदायाची परंपरा जपत त्यांनी अभंग, गवळणी तसेच संस्कृत सुभाषितांच्या माध्यमातून साहित्यनिर्मिती केली आहे. त्यांच्या लेखनातून अध्यात्मासोबतच सामाजिक वास्तवाचे भानही दिसून येते. 'वासुदेव पासष्टी', 'अभंग निर्झर भाग १' आणि 'अभंग निर्झर भाग २' हे त्यांचे ग्रंथ प्रकाशित झाले असून, 'सुभाषित मकरंद' हा संस्कृत ग्रंथ २३ ऑगस्ट रोजी प्रकाशित होणार आहे.

सोशल मीडियाच्या माध्यमातूनही त्यांचे अनेक अभंग, गवळणी आणि संस्कृत सुभाषिते वाचकांपर्यंत पोहोचली आहेत. संत साहित्याची परंपरा आणि संस्कृती नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांच्या साहित्याच्या माध्यमातून होत असल्याचे मानले जाते.

पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल श्री संत ज्ञानेश्वर महाराज थोरल्या पादुका मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष ॲड. विष्णू तापकीर, नमामि इंद्रायणी प्रतिष्ठानचे कार्याध्यक्ष अर्जुन मेदनकर, आळंदी जनहित फाउंडेशनचे अध्यक्ष राजेंद्र घुंडरे, सामाजिक कार्यकर्ते सचिन तापकीर, माऊली घुंडरे आदींनी हिंगणकर महाराज यांचे अभिनंदन करून पुढील साहित्यिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# बार्टी अधिछात्रवृत्तीचा प्रश्न ऐरणीवर; मंत्रालयात मंगळवारी संयुक्त बैठक

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे । प्रतिनिधी :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) अंतर्गत पीएच.डी. संशोधक विद्यार्थ्यांच्या अधिछात्रवृत्तीच्या प्रलंबित मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन' आणि फेलोशिपसाठी अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने आज पुणे येथील शासकीय विश्रामगृहात सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांची भेट घेतली. यावेळी विद्यार्थ्यांनी विविध मागण्यांचे सविस्तर निवेदन सादर केले.

बैठकीत फेलोशिपसाठी अर्ज केलेले विद्यार्थी, संशोधक तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींशी मंत्री शिरसाठ यांनी सविस्तर चर्चा केली. विद्यार्थ्यांनी बार्टीच्या अधिछात्रवृत्तीच्या केवळ १०० जागांमुळे अनेक पात्र विद्यार्थ्यांवर अन्याय होत असल्याचा मुद्दा उपस्थित केला. तसेच ३५ वर्षांच्या वयोमर्यादेच्या अटीमुळे अनेक विद्यार्थ्यांना संशोधनाच्या संधीपासून वंचित राहावे लागत



असल्याचेही शिष्टमंडळाने निदर्शनास आणून दिले.

विद्यार्थ्यांच्या मागण्यांचे गांभीर्य लक्षात घेऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी आणि सकारात्मक तोडगा काढण्यासाठी पुढील मंगळवारी मंत्रालयात संबंधित उच्चपदस्थ अधिकारी आणि विभागांची संयुक्त बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन मंत्री संजय शिरसाठ यांनी दिले. या बैठकीत सर्व तांत्रिक आणि प्रशासकीय अडचणींचा आढावा घेऊन मार्ग काढण्याचे आश्वासनही देण्यात आले.

**आंदोलनाची तयारी कायम**

मंत्र्यांच्या आश्वासनाचे शिष्टमंडळाने स्वागत केले असले तरी मागण्या प्रत्यक्षात पूर्ण होईपर्यंत आंदोलनाची भूमिका कायम ठेवण्यात आली आहे. राहुल डंबाळे, डॉ. राहुल ससाने, सीमा वानखेडे, अक्षय कांबळे, सिद्धार्थ ओव्हाळ, सुरेखा मेश्राम, प्रथमेश सूर्यवंशी आणि नितीन आंधळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळ विद्यार्थ्यांच्या मागण्यांसाठी सातत्याने पाठपुरावा करीत आहे.

मंत्रालयातील बैठकीत सकारात्मक निर्णय होईल, अशी अपेक्षा 'आंबेडकराईट स्टुडंट असोसिएशन'ने व्यक्त केली आहे. मात्र, मागण्या पूर्ण होईपर्यंत कोणतीही तडजोड केली जाणार नाही, अशी स्पष्ट भूमिका संघटनेने घेतली आहे.

दरम्यान, १९ ऑगस्ट २०२६ रोजी पुणे समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर प्रस्तावित बेमुदत धरणे आंदोलनाची तयारी आणि रणनीतीही सुरूच ठेवण्यात येणार असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे मंत्रालयातील आगामी बैठकीत बार्टी अधिछात्रवृत्तीच्या प्रश्नावर नेमका कोणता निर्णय घेतला जातो, याकडे विद्यार्थी आणि संशोधकांचे लक्ष लागले आहे.

## पवित्र श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर श्री क्षेत्र भीमाशंकर भाविकांच्या दर्शनासाठी सज्ज

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**आंबेगाव । प्रतिनिधी**

पवित्र श्रावण महिन्याच्या पार्श्वभूमीवर बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेले श्री क्षेत्र भीमाशंकर भाविकांच्या दर्शनासाठी सज्ज झाले आहे. श्रावण महिन्यात देशभरातून मोठ्या संख्येने भाविक भीमाशंकर येथे दर्शनासाठी येत असल्याने प्रशासनाकडून विविध सोयी-सुविधा आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांची पूर्वतयारी करण्यात येत आहे.

भाविकांना सुलभ व सुरक्षित दर्शन मिळावे, वाहतूक व्यवस्था सुरळीत राहावी तसेच आरोग्य, स्वच्छता, पिण्याचे पाणी आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देता याव्यात, यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात पूर्वतयारी बैठक घेण्यात आली.

या बैठकीस नामदार दिलीप वळसे पाटील, खेडचे आमदार बाबाजी काळे, जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल, आंबेगाव-जुन्नर उपविभागीय अधिकारी अर्चना तांबे, देवस्थानचे अध्यक्ष सुरेश कौदरे, कार्यकारी विश्वस्त मधुकर गवांदे, विश्वस्त रत्नाकर कोडीलकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, प्रशासकीय अधिकारी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.



श्रावण महिन्यातील गर्दी लक्षात घेऊन प्रशासनाने भाविकांच्या सुरक्षिततेला प्राधान्य देत आवश्यक नियोजन करण्याच्या सूचना संबंधित विभागांना दिल्या आहेत.

त्यामुळे यंदाच्या श्रावण महिन्यात भीमाशंकरमध्ये भाविकांना अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि सुलभ दर्शनाचा अनुभव मिळण्याची अपेक्षा आहे.

# 'बारी'वरून कांदळी येथील कलाकेंद्रात पिस्तूलातून गोळीबार; एकजण बाजूला सरकल्याने बचावला

■ दैनिक राज्य लोकतंत्र


**नारायणगाव : प्रतिनिधी**

जुन्नर तालुक्यातील कांदळी येथील तुळजाभवानी सांस्कृतिक कलाकेंद्रात कार्यक्रमाच्या 'बारी' लावण्यावरून झालेल्या वादाने हिंसक वळण घेतले आणि पिस्तूलातून गोळीबार करण्यात आल्याची खळबळजनक घटना शनिवारी (दि. ८) पहाटे साडेचार ते पावणेपाचच्या सुमारास घडली. या गोळीबारात फिरोज कादीर शेख (वय ३१, रा. ओतूर, भोईगल्ली, ता. जुन्नर) हे जखमी झाले.

दरम्यान, गोळीबार करणाऱ्या व्यक्तीने फिर्यादी अक्षय अनिल धोंगडे (वय ३८, रा. वारुळवाडी, ता. जुन्नर) यांच्यावरही पिस्तूल रोखून गोळी झाडल्याचे तक्रारीत नमूद आहे. धोंगडे बाजूला सरकल्याने ते थोडक्यात बचावले. कलाकेंद्रात कार्यक्रमाची तिसरी 'बारी' न लावल्याच्या कारणावरून कोळेकर, आण्णा, चिनू आणि त्यांच्यासोबत असलेल्या एका अनोळखी व्यक्तीचा बारी मालकीण, धोंगडे व कामगारांशी वाद झाला. या चौघांनी शिवीगाळ, दमदाटी, धक्काबुक्की आणि मारहाण केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. वाद विकोपाला गेल्यानंतर चौघांपैकी एका व्यक्तीने अचानक पिस्तूल काढून अक्षय धोंगडे यांच्यावर रोखले आणि धमकी देत गोळी झाडली. धोंगडे यांनी प्रसंगावधान राखत बाजूला सरकल्याने गोळी त्यांना लागली नाही. मात्र, त्याचवेळी तेथे उपस्थित असलेले फिरोज शेख यांच्या शरीराला गोळी लागून ते जखमी झाले.

**जखमीवर आळेफाट्यात उपचार -**

गोळीबारानंतर परिसरात एकच खळबळ उडाली. जखमी



फिरोज शेख यांना तातडीने आळेफाटा येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. या प्रकरणी अक्षय धोंगडे यांनी चार जणांविरुद्ध फिर्याद दिली आहे. तक्रारीत कोळेकर, आण्णा, चिनू तसेच एका अनोळखी व्यक्तीचा समावेश आहे. हे संशयित खेड तालुक्यातील आळंदी, चाकण परिसरातील असल्याची प्राथमिक माहिती पोलिसांना मिळाली आहे. गोळीबाराची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी धनंजय पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक प्रमोद क्षीरसागर, सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण संपांगे तसेच महादेव शेलार यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलिस उपनिरीक्षक गौतम सोनकांबळे यांनी केली असून पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक जगदेव पाटील करीत आहेत. गोळीबारात वापरण्यात आलेले पिस्तूल, संशयितांचा शोध आणि घटनेमागील नेमका वाद याबाबत पोलिसांकडून तपास सुरू आहे.

## सारांश वृत्त

### रेवली ग्रामपंचायतीच्या कारभाराविरोधात हिंदुराष्ट्र सेना मैदानात; तरुणांचे आमरण उपोषण सुरू

■ दैनिक राज्य लोकतंत्र

रेवली : प्रतिनिधी

ग्रामपंचायतीच्या विकासकामांमध्ये कथित अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा आरोप करत हिंदुराष्ट्र सेनेने आक्रमक भूमिका घेतली आहे. विविध मागण्यांसाठी ग्रामपंचायतीच्या दारात तरुणांनी आमरण उपोषण सुरू केले असून, ग्रामपंचायत प्रशासनाच्या कारभाराविरोधात संताप व्यक्त केला जात आहे.

विकासकामांतील कथित गैरप्रकारांची चौकशी करून संबंधितांवर कारवाई करावी, तसेच नागरिकांच्या विविध प्रश्नांकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी आंदोलकांची मागणी आहे.

ग्रामपंचायत प्रशासनाकडून या आंदोलनाची दखल घेत मागण्यांवर कोणती भूमिका घेतली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे. आंदोलकांच्या मागण्या मान्य होणार की आंदोलन आणखी तीव्र होणार, याबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

### बनावट कागदपत्रांप्रकरणी 'पिंपळ ट्री व्हेंचर्स'वर तीन वर्षांची बंदी कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

पाटणा : दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना अंतर्गत 'पिंपळ ट्री व्हेंचर्स' या प्रशिक्षण संस्थेवर करण्यात आलेली तीन वर्षांची ब्लॅकलिस्टची कारवाई पाटणा उच्च न्यायालयाने कायम ठेवली आहे. संस्थेने बनावट रोजगार नोंदी, खोटे बँक स्टेटमेंट आणि दिशाभूल करणारी कागदपत्रे सादर केल्याचे चौकशीत आढळून आल्याने ही कारवाई करण्यात आली होती.

योजनेअंतर्गत प्रशिक्षण घेतलेल्या लाभार्थ्यांच्या रोजगाराबाबत संस्थेने केलेले दावेही चौकशीत संशयास्पद ठरले. नामनिर्देशित केलेल्या अनेक लाभार्थ्यांनी प्रत्यक्षात संबंधित संस्थेने दाखवलेली रोजगाराची माहिती आणि दावे फेटाळून लावल्याचे न्यायालयासमोर आले.

# अदानी प्रकरणावर अमेरिकेतील निर्णय; राहुल गांधींचा मोदींवर थेट हल्ला - समझोता झालेले पंतप्रधान भारताचे हित विकत आहे?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

अदानी समूहाचे अध्यक्ष गौतम अदानी यांच्याविरोधातील अमेरिकेतील फौजदारी आरोप कायमस्वरूपी फेटाळण्यात आल्यानंतर भारतीय राजकारणात पुन्हा एकदा मोदी सरकार-अदानी संबंधांचा मुद्दा पेटला आहे. काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर थेट आणि अत्यंत गंभीर आरोप केले आहेत. त्यांच्या म्हणण्यानुसार, समझोता झालेल्या पंतप्रधानांना भारताचे हित विकण्यास भाग पाडले गेले आणि त्याची मोठी किंमत देशाला मोजावी लागत आहे.

अमेरिकेतील फेडरल न्यायालयाने गौतम अदानी यांच्याविरोधातील फौजदारी आरोप कायमस्वरूपी फेटाळण्याचा निर्णय घेतल्यानंतर राहुल गांधी यांनी या प्रकरणामागे दिसते त्यापेक्षा बरेच काही असल्याचा दावा केला. त्यामुळे अमेरिकन न्यायालयातील कायदेशीर घडामोडी आता भारतातील राजकीय आरोप-प्रत्यारोपांच्या केंद्रस्थानी आल्या आहेत.

राहुल गांधींचा आक्षेप केवळ न्यायालयीन निर्णयावर नाही; त्यांनी थेट पंतप्रधान मोदींच्या धोरणात्मक भूमिकेवर प्रश्न उपस्थित केला आहे. भारताच्या राष्ट्रीय हिताच्या किंमतीवर कोणाचे हित जपले जात आहे? अदानी समूहाभोवती सातत्याने उपस्थित होणारे प्रश्न आणि केंद्र सरकारवर होणारे आरोप यांची पार्श्वभूमी पाहता या प्रकरणाचे राजकीय पडसाद पुन्हा उमटण्याची शक्यता आहे.

मात्र येथे एक महत्त्वाचा फरक लक्षात घ्यावा लागेल- अमेरिकन न्यायालयाने आरोप



फेटाळले ही न्यायालयीन बाब आहे; तर पंतप्रधानांनी भारताचे हित 'विकले' हा राहुल गांधींचा राजकीय आरोप आहे. या दोन्ही गोष्टी एकाच मापाने मोजता येणार नाहीत. त्यामुळे राहुल गांधींच्या आरोपांना पुराव्यांच्या कसोटीवर तपासणे आणि सरकारची अधिकृत भूमिका समोर येणे तितकेच आवश्यक आहे.

पण विरोधकांनी उपस्थित केलेला मूलभूत प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही-जर देशाच्या धोरणांमध्ये विशिष्ट उद्योगसमूहाला सातत्याने फायदा होत असल्याचा आरोप होत असेल, तर सरकारने पारदर्शकपणे स्पष्टीकरण देणे ही त्यांची जबाबदारी नाही का?

अदानी प्रकरण पुन्हा चर्चेत येणे म्हणजे केवळ एका उद्योगपतीवरील अमेरिकन खटल्याचा विषय नाही. हा मुद्दा आता राजकीय पारदर्शकता, राष्ट्रीय हित, कॉर्पोरेट प्रभाव आणि सत्तेच्या निर्णयप्रक्रियेवर सार्वजनिक देखरेख या मोठ्या प्रश्नांशी जोडला गेला आहे.

आणि म्हणूनच राहुल गांधींचा दावा खरा आहे की राजकीय आरोपांचा भाग आहे, यापेक्षा मोठा प्रश्न असा आहे-भारताच्या हिताशी संबंधित निर्णय घेताना सरकारची पारदर्शकता नेमकी कुठे आहे?

## 'केरळ'चे आता 'केरळम'! संसदेत नावबदलाला मंजुरी; राज्याच्या ओळखीवर ऐतिहासिक शिक्कामोर्तब

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : प्रतिनिधी

केरळच्या नावावर अखेर संसदेने शिक्कामोर्तब केले आहे. 'केरळ'चे अधिकृत नाव आता 'केरळम' करण्यासाठीचे विधेयक संसदेत मंजूर झाले आहे. ११ ऑगस्ट रोजी लोकसभेने 'केरळ नावबदल विधेयक, २०२६' मंजूर केल्यानंतर १२ ऑगस्टला राज्यसभेनेही ते आवाजी मतदानाने मंजूर केले. त्यामुळे केरळच्या अधिकृत नावात बदल करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

या नावबदलामागे केवळ शब्दांमध्ये बदल करण्याचा मुद्दा नाही, तर राज्याच्या भाषिक आणि सांस्कृतिक ओळखीशी जोडलेली मागणी आहे. केरळ विधानसभेने २०२४ मध्येच ठराव मंजूर करून केंद्र सरकारला राज्याचे नाव 'केरळम' करण्यासाठी कायदा आणण्याची मागणी केली होती. आता दोन वर्षांनंतर ती मागणी संसदीय प्रक्रियेतून पुढे आली आहे. मल्याळम भाषेत राज्यासाठी वापरले जाणारे 'केरळम' हे नाव अधिकृत करण्याची मागणी यामागे आहे. म्हणजेच देशाच्या प्रशासकीय नकाशावर असलेले नाव आणि स्थानिक भाषेत व संस्कृतीत रूढ असलेली ओळख यांच्यातील अंतर कमी करण्याचा हा प्रयत्न मानला जात आहे. मात्र नाव बदलले म्हणून राज्याचे प्रश्न बदलणार आहेत का, हा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. बेरोजगारी, स्थलांतर, वाढता आर्थिक दबाव, पर्यावरणीय आव्हाने आणि विकासाचा समतोल यांसारखे प्रश्न कायम असताना 'केरळ'चे 'केरळम' झाले, पण केरळमधील सामान्य माणसाचे आयुष्य किती बदलणार? हा प्रश्न राजकीय चर्चेत नक्कीच उपस्थित होणार आहे. नावबदल हा भावनिक आणि सांस्कृतिक अस्मितेशी संबंधित विषय असू शकतो; मात्र त्यासोबत राज्याच्या प्रत्यक्ष विकासाच्या प्रश्नांनाही समान महत्त्व मिळणे आवश्यक आहे. कारण सरकारी कागदपत्रांवर नाव बदलणे तुलनेने सोपे असते; पण नागरिकांच्या जीवनमानात बदल घडवणे ही खरी राजकीय आणि प्रशासकीय परीक्षा असते.

## न्यायमूर्ती यशवंत वर्मा प्रकरणात आरोप सिद्ध; न्यायव्यवस्थेवरील विश्वासाला पुन्हा धक्का?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नागपूर । प्रतिनिधी

न्यायव्यवस्थेच्या पारदर्शकतेवर आणि न्यायाधीशांच्या उत्तरदायित्वावर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण करणाऱ्या न्यायमूर्ती यशवंत वर्मा प्रकरणात आता निर्णायक टप्पा समोर आला आहे. न्यायमूर्तींच्या चौकशीसाठी स्थापन करण्यात आलेल्या तीन सदस्यीय समितीने त्यांच्यावरील सर्व आरोप सिद्ध झाल्याचे स्पष्ट केले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती अरविंद कुमार यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने आपला निष्कर्ष लोकसभा पटलावरील चौकशी प्रक्रियेसाठी सादर केला आहे.

या प्रकरणातील सर्वात गंभीर मुद्दा म्हणजे न्यायमूर्ती वर्मा यांच्या निवासस्थानी असलेल्या स्टोअररूममध्ये आढळून आलेल्या रोख रकमेचे प्रकरण. समितीच्या निरीक्षणानुसार, या रोख रकमेची उपस्थिती आणि मालकी याबाबत न्यायमूर्ती वर्मा समाधानकारक स्पष्टीकरण देऊ शकले नाहीत. उलट त्यांचे स्पष्टीकरण 'टाळाटाळ करणारे आणि असमाधानकारक' असल्याचे समितीने नमूद केले आहे. मुद्दा केवळ एका न्यायाधीशाच्या घरात रोख रक्कम सापडल्याचा नाही. प्रश्न आहे तो न्यायव्यवस्थेतील सर्वोच्च नैतिक निकषांचा. सामान्य नागरिकाच्या घरात बेहिशेबी रोकड सापडली तर तपास यंत्रणा प्रश्नांचा भडिमार करते; मग न्यायदान करणाऱ्या व्यक्तीच्या निवासस्थानी एवढ्या गंभीर स्वरूपाची बाब समोर आल्यानंतर स्पष्टीकरणच समाधानकारक नसेल, तर त्याची गंभीरता किती मोठी मानायची? लोकशाहीमध्ये न्यायपालिका ही शेवटची आशा मानली जाते. सरकारवर प्रश्न उपस्थित झाले, प्रशासनावर संशय निर्माण झाला किंवा राजकीय व्यवस्था अपयशी ठरली, तरी नागरिक न्यायालयाकडे पाहतो. त्यामुळे न्यायाधीशांच्या आचरणाबाबतचा संशय हा केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही; तो संपूर्ण संस्थेच्या विश्वासार्हतेला धक्का देऊ शकतो. आता या समितीने आरोप सिद्ध झाल्याचे म्हटल्याने पुढील घटनात्मक आणि संसदीय प्रक्रिया अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. या प्रकरणात कोणतीही घाई, राजकीय सोय किंवा संस्थात्मक बचावाची भूमिका न घेता पुरावे, प्रक्रिया आणि घटनात्मक जबाबदारी यांना प्राधान्य मिळणे आवश्यक आहे.

कारण न्यायालयात इतरांना न्याय देणाऱ्या व्यक्तीच्या बाबतीतच जर गंभीर प्रश्न अनुत्तरित राहिले, तर सामान्य नागरिकाने न्यायव्यवस्थेवर विश्वास ठेवायचा तरी कसा?

## कृष्णभक्तांचे प्रतिनिधित्व कोण करणार? सर्वोच्च न्यायालयानेच उच्च न्यायालयाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उभे केले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली : वृत्तसंस्था

कृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह वादातील 'सर्व कृष्णभक्तांचे प्रतिनिधित्व नेमके कोण करणार?' या मूलभूत प्रश्नावर आता सर्वोच्च न्यायालयाने अलाहाबाद उच्च न्यायालयाच्या प्रक्रियेवरच प्रश्न उपस्थित केला आहे. १२ ऑगस्ट रोजी न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती संजीव सचदेवा यांच्या खंडपीठाने हे प्रकरण पुन्हा उच्च न्यायालयाकडे पाठवण्याचे संकेत दिले आहेत. त्यामुळे आधीच संवेदनशील असलेल्या या प्रकरणातील न्यायालयीन प्रक्रियेवर पुन्हा एकदा लक्ष केंद्रित झाले आहे.

या वादातील अनेक दाव्यांपैकी कोणता दावा मुख्य किंवा 'लीड केस' मानायचा, यावरून हा प्रश्न निर्माण झाला आहे. अलाहाबाद उच्च न्यायालयाने दुसऱ्या एका दाव्यातील हिंदू पक्षाला भगवान कृष्णाच्या सर्व भक्तांचे प्रतिनिधित्व करणारा पक्ष मानले होते. मात्र सर्वोच्च न्यायालयाने याच प्रक्रियेतील एक महत्त्वाचा मुद्दा अधोरेखित केला-इतर सर्व वादींना नोटिसा देण्यात आल्या होत्या का?

सर्वोच्च न्यायालयासमोर मांडण्यात आलेल्या भूमिकेनुसार, उच्च न्यायालयाने ज्या अर्जावर विचार केला, तो अर्ज मुळात दुसऱ्या स्वरूपाच्या मागणीसाठी होता आणि सर्व संबंधित वादींना नोटिसाही बजावण्यात आल्या नव्हत्या. मग त्यांच्या वतीने निर्णय घेण्याचा अधिकार कोणाला आणि कोणत्या प्रक्रियेतून मिळाला, हा प्रश्न स्वाभाविकपणे निर्माण होतो.

ही बाब केवळ तांत्रिक न्यायालयीन प्रक्रिया म्हणून दुर्लक्षित करता येणार नाही. कारण एखाद्या व्यक्तीला 'सर्व कृष्णभक्तांचा प्रतिनिधी' मानणे म्हणजे त्या व्यक्तीला हजारो-लाखो भाविकांच्या वतीने न्यायालयात भूमिका मांडण्याची व्यापक कायदेशीर मान्यता देणे. अशा निर्णयात संबंधित सर्व पक्षांना ऐकून घेण्याची प्रक्रिया किती काटेकोरपणे पाळली गेली, हा मुद्दा अत्यंत महत्त्वाचा ठरतो.

सर्वोच्च न्यायालयाने थेट निकाल देण्याऐवजी प्रकरण पुन्हा अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे पाठवण्याची शक्यता व्यक्त केली आहे. म्हणजेच न्यायालयाचा भर सध्या 'कोण बरोबर आणि कोण चूक?' यापेक्षा 'ही प्रक्रिया योग्य पद्धतीने झाली का?' यावर असल्याचे दिसते.

कृष्ण जन्मभूमी-शाही ईदगाह वाद आधीच धार्मिक आणि राजकीयदृष्ट्या अत्यंत संवेदनशील आहे. त्यामुळे अशा प्रकरणात न्यायालयीन प्रक्रिया जर पारदर्शक, सर्वसमावेशक आणि प्रत्येक संबंधित पक्षाला ऐकून घेणारी नसेल, तर त्यातून निर्माण होणारा संशय वादापेक्षा मोठा ठरू शकतो.

भगवान कृष्णाच्या भक्तांचे प्रतिनिधित्व कोण करणार, हा प्रश्न धार्मिक भावनेपेक्षा आधी कायदेशीर अधिकाराचा आहे. आणि त्या अधिकाराचा निर्णय भावनेने नव्हे, तर काटेकोर न्यायप्रक्रियेनेच झाला पाहिजे.

## टाटा समूहाला मोठा धक्का! चंद्रशेखरन यांच्या माघारीच्या निर्णयाने शेअर्स घसरले; 'टाटा'च्या नेतृत्वावरच प्रश्नचिन्ह?

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली । प्रतिनिधी

भारताच्या सर्वात मोठ्या आणि विश्वासार्ह उद्योगसमूहांपैकी एक असलेल्या टाटा समूहात नेतृत्वबदलाची चाहूल लागताच शेअर बाजारात मोठी खळबळ उडाली आहे. टाटा सन्सचे अध्यक्ष एन. चंद्रशेखरन यांनी पुढील कार्यकाळासाठी पुनर्नियुक्तीची मागणी न करण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतर बुधवारी टाटा समूहातील अनेक कंपन्यांच्या शेअर्समध्ये घसरण झाली. नेतृत्वाच्या भवितव्याबाबत निर्माण झालेली अनिश्चितता आता थेट बाजारमूल्यावर परिणाम करताना दिसत आहे.

चंद्रशेखरन यांनी पुनर्नियुक्ती न घेण्यामागे संचालक मंडळाचा पुरेसा पाठिंबा नसल्याचे कारण दिल्याने या निर्णयाचे गांभीर्य आणखी वाढले आहे. देशातील सर्वात मोठ्या उद्योगसमूहाच्या सर्वोच्च पदावर असलेल्या व्यक्तीनेच मंडळाच्या पाठिंब्याचा अभाव व्यक्त करणे, हा केवळ वैयक्तिक नेतृत्वबदलाचा विषय नसून टाटा समूहाच्या अंतर्गत निर्णयप्रक्रियेबाबत गंभीर प्रश्न निर्माण करणारा संकेत मानला जात आहे.

या बातमीचा सर्वात तात्काळ परिणाम शेअर बाजारात दिसला. टाटा समूहाची प्रमुख आयटी कंपनी असलेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसच्या शेअरमध्ये सुमारे ३.९ टक्क्यांची घसरण झाली आणि निफ्टी निर्देशांकातील तो दिवसाचा सर्वात मोठा घसरणारा शेअर ठरला. इतर टाटा कंपन्यांच्या शेअर्समध्येही सुरुवातीला दबाव निर्माण झाला. मात्र नंतर काही शेअर्सनी दिवसातील नीचांकी पातळीवरून काहीशी सुधारणा केली.

टाटा समूहासाठी ही वेळ आधीच आव्हानात्मक आहे. नियामक तपासणीपासून वाढत्या किंमतदबावापर्यंत अनेक आघाड्यांवर समूहाला आव्हानांचा सामना करावा लागत आहे. त्यातच नेतृत्वाच्या सातत्याबाबत अनिश्चितता निर्माण झाल्याने गुंतवणूकदारांच्या चिंतेत भर पडली आहे.

विशेष म्हणजे २०२६ मध्ये टाटा समूहातील कंपन्यांची कामगिरीही एकसारखी राहिलेली नाही. टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसचा शेअर वर्षभरात सुमारे २५.६ टक्क्यांनी घसरला, तर टायटनच्या शेअरने सुमारे २६ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे. म्हणजेच 'टाटा' या ब्रँडची ताकद कायम असली तरी समूहातील प्रत्येक व्यवसायासाठी परिस्थिती सारखी राहिलेली नाही.

टाटा समूहाची सर्वात मोठी ताकद म्हणजे त्याची विश्वासार्हता, दीर्घकालीन दृष्टी आणि संस्थात्मक स्थैर्य. त्यामुळे चंद्रशेखरन यांच्या निर्णयानंतर गुंतवणूकदारांचा खरा प्रश्न केवळ नवा अध्यक्ष कोण? हा नाही. प्रश्न आहे-टाटा समूहाच्या पुढील दशकाची दिशा कोण ठरवणार आणि संचालक मंडळामध्ये त्या दिशेबाबत एकमत किती आहे?

कारण टाटांच्या इतिहासात नेतृत्वबदल हा केवळ एका खुर्चीचा बदल नसतो; तो संपूर्ण समूहाच्या रणनीतीचा संकेत असतो. आणि बुधवारी बाजाराने दिलेला संदेश स्पष्ट आहे-नेतृत्वाबाबतची अनिश्चितता गुंतवणूकदारांना अजिबात पसंत नाही.

## डॉलरच्या साम्राज्याला आव्हान देणार भारत? ब्रीक्स परिषदेत 'डी-डॉलरीकरणा'चा अजेंडा मांडणार का; संसदीय समितीने सरकारला थेट घेरले!

■ दैनिक राज्य लोकतंत्र

नवी दिल्ली / प्रतिनिधी

जागतिक अर्थव्यवस्थेच्या केंद्रस्थानी असलेल्या अमेरिकी डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान देण्याची वेळ भारताने खरोखरच आणली आहे का? आणि जर होय, तर सप्टेंबरमध्ये नवी दिल्ली येथे होणाऱ्या १८व्या इठखउड शिखर परिषदेत भारत 'डी-डॉलरीकरणा'चा ठोस अजेंडा पुढे रेटणार आहे का? या प्रश्नांनी आता केंद्र सरकारसमोरच मोठे आव्हान उभे केले आहे. संसदेच्या परराष्ट्र व्यवहार विषयक स्थायी समितीने ११ ऑगस्ट २०२६ रोजी सरकारला याबाबत थेट प्रश्न विचारले. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शशी थरूर यांच्या अध्यक्षतेखालील या समितीने स्थानिक चलनातील व्यापार, जागतिक वित्तीय संस्थांवरील अमेरिकेचे वर्चस्व आणि इठखउड च्या स्वतंत्र चलनाच्या शक्यतेबाबत सरकारची भूमिका जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

ही चर्चा अशा वेळी होत आहे, जेव्हा इठखउड देशांमध्ये डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याची मागणी सातत्याने पुढे येत आहे. विशेषतः वाढते भू-राजकीय संघर्ष, आर्थिक निर्बंध आणि अमेरिकी निर्बंधांचा दबाव यामुळे 'आर्थिक सार्वभौमत्व' हा मुद्दा आता केवळ आर्थिक तज्ज्ञांच्या चर्चेपुरता राहिलेला नाही. संसदीय समितीतील सदस्यांनी सरकारला सवाल केला की, भारत अधिक मोठ्या प्रमाणावर आर्थिक सार्वभौमत्वाचा पाठपुरावा का करत नाही? स्थानिक चलनांमध्ये व्यापार वाढवला तर देशांना अमेरिकी निर्बंधांना बगल देण्यासाठी अधिक आर्थिक स्वायत्तता मिळू शकते, असा मुद्दाही समितीसमोर मांडण्यात आला.

या सगळ्याच्या पार्श्वभूमीवर भारतीय रिझर्व्ह बँकेची भूमिका विशेष महत्त्वाची ठरते. आरबीआयने इठखउड देशांच्या अधिकृत डिजिटल चलनांना परस्पर जोडण्याच्या कल्पनेचा वारंवार पुरस्कार केला आहे. सीमापार व्यापार आणि पर्यटनाशी संबंधित देयके स्थानिक डिजिटल चलनांच्या माध्यमातून करता आली, तर अमेरिकी डॉलरवरील अवलंबित्व कमी होऊ शकते, असा आरबीआयचा युक्तिवाद आहे. म्हणजेच प्रश्न फक्त 'डॉलरऐवजी कोणते चलन?' इतकाच नाही; प्रश्न आहे भविष्यातील जागतिक व्यवहारांची आर्थिक पायाभूत व्यवस्था कोण ठरवणार?

इठखउड मध्ये सुरुवातीला ब्राझील, रशिया, भारत, चीन आणि दक्षिण आफ्रिका हे देश होते. २०२४ पासून या गटाचा विस्तार झाला आणि इजिप्त, इथिओपिया, इराण, संयुक्त अरब अमिराती आणि इंडोनेशिया यांसारख्या देशांचा समावेश झाल्याने त्याचे आर्थिक आणि भू-राजकीय वजन आणखी वाढले. त्यामुळे इठखउड च्या माध्यमातून डॉलरच्या पर्यायी आर्थिक व्यवस्थेचा विचार झाला, तर त्याचे परिणाम केवळ सदस्य देशांपुरते मर्यादित राहणार नाहीत.

मात्र भारताची भूमिका येथे अत्यंत सावध आहे. भारताने इठखउड च्या स्वतंत्र सामायिक चलनाच्या कल्पनेबाबत उत्साह दाखवण्याऐवजी स्थानिक चलनांमध्ये व्यापार, परस्पर देयक व्यवस्था आणि डिजिटल चलनांच्या जोडणीवर भर दिला आहे. कारण डॉलरचे वर्चस्व एका दिवसात संपवणे शक्य नाही. आंतरराष्ट्रीय व्यापार, परकीय चलन साठे, कर्जबाजारीपणा आणि जागतिक वित्तीय व्यवहारांमध्ये डॉलरची भूमिका अजूनही प्रचंड आहे.

म्हणूनच सप्टेंबर २०२६ मधील नवी दिल्ली इठखउड परिषद भारतासाठी अत्यंत महत्त्वाची ठरणार आहे. भारत फक्त डॉलरवरील अवलंबित्व कमी करण्याची भाषा करणार की त्यासाठी ठोस आर्थिक आराखडाही मांडणार? स्थानिक चलनातील व्यापार किती वाढवायचा? इठखउड डिजिटल चलनांना परस्पर जोडण्याबाबत कोणते पाऊल उचलायचे? आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे स्वतंत्र इठखउड चलनाच्या कल्पनेबाबत भारताची अंतिम भूमिका काय?

संसदीय समितीने विचारलेले प्रश्न त्यामुळे केवळ सरकारच्या परराष्ट्र धोरणाशी संबंधित नाहीत. ते भारताच्या भविष्यातील आर्थिक स्वायत्ततेशी जोडलेले आहेत. अमेरिकी डॉलरच्या सावलीत जागतिक अर्थव्यवस्थेचा भाग राहायचे की स्वतःच्या आर्थिक व्यवस्थेला पर्याय निर्माण करायचा-दिल्लीतील इठखउड परिषद भारताला या प्रश्नाचे उत्तर देण्याची संधी देणार आहे.